# ज्ञान प्रबोधिनी नेतृत्व संवर्धन केंद्र

## प्रशासकीय नेतृत्वाच्या पायाभरणीसाठी...

समाज परिवर्तनासाठी
नेतृत्व संवर्धन

# लीडरशीप फाउंडेशन व प्रिपरेटरी UPSC कॉम्प्रिहेन्सिव्ह कोर्स

(१२ वीची परीक्षा दिलेले ते पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी)

## २०२६ चे माहितीपत्रक


















## २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू

दोन वर्षांचा अभ्यासक्रमपूर्ण केलेले सुमारे ३०+ अधिकारी विविध सेवांमध्ये (UPSC, MPSC इ.) कार्यरत

सुमारे ३०० विद्यार्थी स्पर्धा परीक्षांची तयारी करीत आहेत.

सुमारे १५० जण विविध क्षेत्रांत कर्तृत्व फुलवत आहेत.

ज्ञान प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा केंद्राच्या माध्यमातून १५०० हून अधिक अधिकारी कार्यरत!

**आजच नोंदणी करा...**

एकच तुकडी...मर्यादित प्रवेश!

# या कोर्समध्ये का सहभागी व्हावे?

ज्ञान प्रबोधिनीतल्या एका प्रसिद्ध गाण्यात मनाला खूप भिडणाऱ्या दोन ओळी आहेत.

**अशा शर्यती चालल्या आंधळ्यांच्या,**
**तयांमागुनी धावणे हे ततः किम्?**

अर्थात पद, पैसा, प्रसिद्धी यांच्यामागे धावणाऱ्या आंधळ्यांच्या शर्यतीत न जाता खरोखर देशाच्या हिताचे, समाजाच्या उपयोगाचे काम करू इच्छिणाऱ्यांसाठी हा कोर्स!

तुम्ही UPSC चा गांभीर्याने अभ्यास करू इच्छिता का? तुम्हाला फक्त अभ्यासक्रम पूर्ण करायचा आहे की या मधून स्वतःची जडणघडण देखील व्हावी असे वाटते? UPSC चा अभ्यासक्रम शिकवणारे क्लासेस बरेच उपलब्ध आहेत, साहित्यही मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे, पण या साहित्यावर प्रक्रिया करायला शिकवणारे, त्यासाठी लागणारी विविध अभ्यास व विचार कौशल्ये शिकवणारे, त्याचा सद्य घडामोडींशी संदर्भ जोडत विषयाची समज वाढवणारे क्लासेस अगदी अभावानेच आढळतात/दिसून येतात.

ज्ञान प्रबोधिनीच्या **'नेतृत्व संवर्धन केंद्र'** व **'स्पर्धा परीक्षा केंद्र'** यांचे कोर्सेस हे त्यापैकी अग्रगण्य कोर्सेस आहेत. नेतृत्व संवर्धन केंद्रात बारावी झालेल्या व पदवीचे शिक्षण घेणाऱ्या युवक, युवतींसाठी **नेतृत्व पायाभरणी (Foundation) आणि स्पर्धा परीक्षा तयारी (Preparatory)** असा **एकत्रित (Comprehensive)** कोर्स आम्ही घेऊन येत आहोत!

तुम्ही दोन वर्षांच्या अथवा एका वर्षाच्या कोर्सला प्रवेश घेऊ शकाल. त्यानंतर पदव्युत्तर गटासाठी स्पर्धा परीक्षा केंद्राच्या, Complete Batch, Mains साठी Mission Batch तर Interview साठी 'प्रेरणा' अशा कोर्सेसमध्ये तुम्ही प्रवेश घेऊ शकाल. UPSC च्या स्पर्धा परीक्षांच्या परिपूर्ण तयारीसाठी ज्ञान प्रबोधिनीचे हे विविध कोर्सेस तयारीच्या विविध टप्प्यांवर तुम्हाला नक्कीच उपयोगी होतील.

**Learning to Learn, Perspective Building** हे प्रबोधिनीच्या कोर्सचे परवलीचे शब्द (Key Words)! फक्त स्पर्धा परीक्षांची तयारी एवढाच संकुचित हेतू न ठेवता, कोणत्याही क्षेत्रात ठसा उमटविण्यासाठी **वृत्तीघडण (Attitude Formation)** व **प्रेरणा जागरण (Motivation Building)** करणे हे इथल्या या कोर्सचे मुख्य उद्दिष्ट आहे. निव्वळ खर्डे घाशी/वरवरची तयारी न करता UPSC च्या परीक्षेची पूर्वतयारी व नेतृत्वाची जडणघडण करण्याची संधी अशा दोन्ही गोष्टी एकाच ठिकाणी मिळणं हे ज्ञान प्रबोधिनीचं वैशिष्ट्य आहे.

**म्हणून तुम्ही डोळसपणे या कोर्सची निवड करा!**

## "तुम्हाला प्रशासकीय अधिकारी का व्हायचे आहे?"

- या प्रश्नाचे पाठ केलेले किंवा पठडीतले उत्तर न देता, प्रत्यक्ष अनुभवातून खरे व प्रामाणिक उत्तर तुम्हाला सापडावे...
- समाज व प्रशासकीय यंत्रणांच्या भेटींमधून व तेथून होणाऱ्या संवादातून समाजात बदल घडविण्याचे तुमचे Conviction वाढावे...
- अत्यंत अवघड अशा UPSC स्पर्धा परीक्षेचा अभ्यास चिकाटीने करण्याचे बळ तुम्हाला मिळावे...
- अनुभव, Reflective Process व Mentoring यांमधून तुमची Passion व Commitment पक्की व्हावी...
- Life Goals चा विचार करत करत Career Goals गाठण्याचे सामर्थ्य तुम्ही मिळवावे...

**त्यासाठी हा कोर्स तुम्हाला निश्चितच मदत करेल.**
**त्यासाठी या कोर्समध्ये आवर्जून सहभागी व्हा! तुम्हा सर्वांचे स्वागत !**

**ज्ञान प्रबोधिनीच्या कोर्सेस मध्ये सहभागी होऊन आज अखेर नेतृत्व संवर्धन केंद्रातील ३० हून अधिक विद्यार्थी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन अधिकारी झाले आहेत, तर सुमारे ५० विद्यार्थी विविध सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रांमध्ये भरीव योगदान करत आहेत. तसेच गेल्या ३० वर्षांमध्ये स्पर्धा परीक्षा केंद्राद्वारे परीक्षा उत्तीर्ण होऊन सुमारे १५०० अधिकारी भारतात आणि भारताबाहेरही कार्यक्षम व समाजाभिमुख अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.**

# लीडरशीप फाउंडेशन व प्रिपरेटरी कॉम्प्रिहेन्सिव्ह कोर्स

## सर्वसाधारण माहिती व अपेक्षा

- **कोर्स कोणासाठी?** – समाजाभिमुख, कार्यक्षम व चारित्र्यसंपन्न नेतृत्व करण्यासाठी प्रशासकीय अधिकारी होऊ इच्छिणारे, **कोणत्याही विद्याशाखेत पदवीपूर्व शिक्षण** घेत असेलेले विद्यार्थी (undergraduate students) या कोर्समध्ये प्रवेश घेऊ शकतात. (यावर्षी १२ वीची परीक्षा दिलेले विद्यार्थीही कोर्सला प्रवेश घेऊ शकतील.)
- **कोर्सचे स्वरूप** – हा कोर्स २ वर्षांचा असून त्यामध्ये १-१ वर्षांचे २ अभ्यासक्रम बेसिक (जिज्ञासा) व ॲडव्हान्स (आकांक्षा) या नावाने चालतात. बेसिक कोर्स केलेल्या विद्यार्थ्यांनाच ॲडव्हान्सच्या वर्गामध्ये प्रवेश मिळतो.
- **कोर्सचे तपशील – कालावधी – जुलै २०२६ ते मार्च २०२७ (बेसिक) व जून २०२७ ते मार्च २०२८ (ॲडव्हान्स)**
  **वेळ –** सोमवार ते शुक्रवार सायं. ६ ते रा.८, शनिवारी दु. ३ ते रा. ८.००
  **विद्यार्थी संख्या –** ६० विद्यार्थ्यांना प्रवेश. (वैयक्तिक माहिती, मुलाखतीच्या आधारे निवड.)
- **Faculty/प्रशिक्षक** – UPSC ची मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेले/पद मिळवलेले **विद्यार्थी-अध्यापक** प्रिपरेटरीचा अभ्यासक्रम शिकवतात, तर अभ्यासकौशल्ये, व्यक्तिमत्त्व व नेतृत्व विकसनातील विविध विषय तज्ज्ञ प्रशिक्षक शिकवतात. वैयक्तिक व गटश: Mentoring/मार्गदर्शन तज्ज्ञ व्यक्तींद्वारा उपलब्ध होते.
- **वर्गांचे माध्यम** – UPSC (प्रिपरेटरी) परिक्षेच्या तयारीची सत्रे प्रामुख्याने इंग्रजीमधून घेतली जातात. गटाच्या आवश्यकतेनुसार गरजेपुरता मराठीचा वापर केला जातो. नेतृत्व पायाभरणीचे (फाऊंडेशन) सर्व उपक्रम प्रामुख्याने मराठी भाषेतून होतात. गटाच्या गरजेनुसार इंग्रजीचा वापर केला जातो.
- **Study Material-Notes बाबत** – विद्यार्थ्यांनी स्वयंअध्ययन कौशल्यांचा वापर करून स्वत:ची टिपणे काढावीत, यावर भर असतो. आवश्यकतेनुसार मर्यादित स्वरूपात टिपणे दिली जातात.
- **अभ्यासिका** – विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी सकाळी ७ ते रात्री १० या वेळात अभ्यासिकेची सोय उपलब्ध आहे. मर्यादित जागा उपलब्ध. त्याचे स्वतंत्र शुल्क भरावे लागेल.
- **वर्गाचे वार्षिक नियोजन** – वर्षाच्या सुरुवातीला वार्षिक आराखडा व सत्राचे नियोजन दिले जाते. यामध्ये कोणत्या महिन्यात कोणते विषय शिकविले जाणार व कोणते कार्यक्रम व मूल्यमापन होणार याची माहिती दिली जाते. दर शनिवारी पुढील आठवड्यातील तासांचे विषय व प्रकरणांनुसार वेळापत्रक दिले जाते.
- **पथक योजना** – सर्व विद्यार्थी विविध गटांमध्ये (पथकांमध्ये) विभागले जातात. त्यांना नियमित व प्रासंगिक कामांच्या जबाबदाऱ्या दिल्या जातात. त्या त्यांनी पथकाने मिळून करावयाच्या असतात. ही कामे करता करता विद्यार्थ्यांनी व्यावहारिक ज्ञान वाढविण्याचा, नियोजन व कार्यवाही कौशल्यांचा सराव करण्याचा, गटात काम करण्याचा व नेतृत्व करण्याचा अनुभव घ्यावा व त्यादृष्टीने सर्व विद्यार्थ्यांनी मनापासून सहभागी व्हावे ही अपेक्षा असते. प्रत्येक पथक आपले पथकप्रमुख निवडतात. दर दीड महिन्यांनी पथकप्रमुख बदलतात. पथकप्रमुखांची साप्ताहिक बैठक होते. त्यात कामांचा आढावा, त्यातून होणारे शिक्षण व नेतृत्वाच्या विविध पैलूंवर चर्चा व मार्गदर्शन होते.
- **प्रार्थना व उपासना** – वर्गाची सुरुवात व शेवट सामूहिक प्रार्थनेने होतो, तर आठवड्यातून एकदा दर शनिवारी एकत्रित उपासना होते. स्वयं-विकासासाठी, स्वत:च्या आयुष्यातले ध्येय ठरविण्यासाठी या सर्वांचा डोळसपणे कसा वापर करायचा याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते.
- **मूल्यमापन व प्रमाणपत्र** – वर्षभरात फाउंडेशन व प्रिपरेटरी या दोन्ही भागांच्या मिळून विविध परीक्षा, Presentations, प्रकल्प, विविध उपक्रमांमधला सहभाग, उपस्थिती इ. च्या आधारे १०००(± १००) गुणांचे मूल्यमापन केले जाते. त्यामध्ये प्रत्येक विभागात प्रत्येकी ४०% पेक्षा अधिक व एकूण मिळून ५०% पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्यांना प्रमाणपत्र दिले जाते व विशेष गुणवत्ता मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसेही दिली जातात.
- **नियमित अभ्यासाचा आग्रह** – रोजच्या तासांव्यतिरिक्त विद्यार्थ्यांनी रोज सरासरी ३ ते ४ तास UPSC द्वारा होणाऱ्या स्पर्धा परीक्षेसाठीचा स्वत:चा अभ्यास नियमितपणे करणे अपेक्षित आहे. वर्गात येण्यापूर्वी त्या त्या प्रकरणाचे पूर्ववाचन करून व प्रश्न काढून विद्यार्थ्यांनी बसावे व लक्षपूर्वक विषय समजून घ्यावा, तरच वर्गात शिकविलेले समजू शकेल. दिलेले गृहपाठ, Presentations, NCERT व अन्य संदर्भ पुस्तकांचे, तसेच वृत्तपत्रे व नियतकालिके यांचे नियमित वाचन, टिपणे काढणे, मासिक परीक्षांचा अभ्यास इ. गोष्टी वेळच्यावेळी करणे अपेक्षित आहे, त्यातूनच स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी योग्य गतीने होऊ शकेल.
- **उपस्थिती व शिस्त** – विद्यार्थ्यांची किमान ८०% उपस्थिती (रोजची सत्रे व फाऊंडेशन भागातील विद्यार्थी अनिवासी उपक्रम) आवश्यक आहे. सलग ५ दिवसांपेक्षा अधिक काळ अनुपस्थित राहण्यासाठी वर्ग समन्वयकाकडून लेखी परवानगी घेणे अनिवार्य आहे. शिक्षणाला पूरक असेच वर्गाचे वातावरण राहील यासाठी विद्यार्थ्यांनी मूलभूत शिस्तीचे स्वयंस्फूर्तीने पालन करणे अपेक्षित आहे.
- **युवती सहनिवास** – ग्रामीण भागातील व आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थीनींसाठी अल्प शुल्कात सहनिवास (Hostel) व्यवस्था केली जाईल. २०२५-२६ या वर्षात निवडक पाच (५) विद्यार्थीनींना संधी मिळू शकेल.

# लीडरशीप फाऊंडेशन व प्रिपरेटरी कोर्स - २ वर्षांचा अभ्यासक्रम

## Leadership Foundation

### Personality Development

- Physical Development
- Mental Development
- Intellectual Development
- Emotional Development
- Social Development
- SWOT Analysis
- Spiritual Development
- Challaneges before Youth
- Meaningful Career & Life Goals
- Knowing & Exploring Self
- Stress Management
- Time Management

### Leadership Awareness and Skills Development

- Goal Setting & Vision Building
- Planning & Execution
- Effective Communication (Public Speaking, Debate, Meeting Management, Group Discussion, Interviewing)
- Problem Solving
- Decision Making
- Team Work & Team Building
- Leadership Functions, Roles & Styles
- Self Motivation & Motivating Others
- Creative Thinking
- Critical Thinking
- Project Management Skill
- Optional Courses

### Nurturing Leadership Qualities

- Taking Initiative
- Facing Unexpected Situations
- Being Responsible & Responsive
- Confidence Building
- Stretching the abilities
- High Energy Level & Enthusiasm
- Reflective Thinking & Metacognition

### Exploring the System & Society

- Knowing different Government Systems operating at Local, Block & District Level
- Understanding the contribution of various Factors and Stake holders in the development of Village, Block & District
- Exploring the dynamics involved in various sections of the Society
- Discussing various developmental issues
- Special Lectures & Interactions with Govt. Officers & Social Leaders

## UPSC Preparatory

### GS/CSAT

- Polity, History, Geography
- Science & Tech., Economics, Environment
- Ethics, Social Justic
- GMAT, BNDI, LRAA, Comprehension
- Essay Writting, Current Issues analysis
- Basics of International Relations

### UPSC Orientation

- Exam Pattern, Syllabus and PYQs
- Various Services & Work Profiles
- Overall Planning For Preperation
- Books, References and E-References
- Prelim and Mains Study Strategy
- Selection of Optional
- Writing Mains - Presentation Skills
- MCQ Approach to Study
- Personality Test
- DAF & Credit Courses
- Exp. Sharing by Past Students

### Study Skills

- Study Steps, Methods & Good Habits
- Perspective Building & Interdisciplinary Approach
- Reading Faster and Better
- Active Listening & Smart Questioning
- In-Depth Comprehension
- Current Issues
- Time and Resource Planning
- Information Gathering & Organising
- Information Processing (Charts, Notes taking & making, Mind Maps)
- Effective techniques of E-Surfing
- Memory and Revision Techniques
- Presentations & Seminars Delivery
- Effective Group Study Methods
- Critical Thinking Applied to UPSC Preparation

### Current Events

- How to read Newspaper & Periodicals
- Importance & Relevance of a news
- Smart Questioning
- Organising Relevant Data & Information
- Relating Syllabus to Current Events
- Analysis & Interpretation
- Developing Perspective
- Group Discussion & News Circle
- News Debates
- Developing Perspective about Issues
- Differentiating between Facts & Opinions

# कोर्सचे स्वरूप


लीडरशीप फाऊंडेशन व UPSC प्रिपरेटरी अशा दोन भागांमध्ये अभ्यासक्रम विभागलेला असून दोन्ही भाग तितकेच महत्त्वाचे आहेत व प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी दोन्ही भाग पूर्ण करणे आवश्यक आहे.

## १) लीडरशीप फाऊंडेशन

आत्मविश्वास वाढविणाऱ्या व नेतृत्वाची पायाभरणी करणाऱ्या खालील सर्व उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होणे अपेक्षित आहे. प्रत्येक वर्गामध्ये वर्षभरात १२ दिवस निवासी उपक्रम होतील.

| तपशील | Basic (जिज्ञासा) | Advance (आकांक्षा) |
|---|---|---|
| **१. निवासी उपक्रम (दीड ते साडेतीन दिवसांचे)** | – गिरिभ्रमण रात्रसहल<br>– नेतृत्व संवर्धन शिबिर – १<br>– साहस शिबिर<br>– ग्रामीण परिचय शिबिर | – तालुका अभ्यास सहल<br>– नेतृत्व संवर्धन शिबिर – २<br>– वैचारिक अभ्यास शिबिर<br>– गिरिभ्रमण सहल |
| **२. अनिवासी उपक्रम** | – व्यक्तिकार्ये व जोडीकार्ये | – गटकार्ये व मुलाखती घेणे |
| **३. व्यक्तिमत्त्व विकसन सत्रे** | – १० सत्रे | – १० सत्रे |
| **४. नेतृत्व व विचार कौशल्ये सराव** | – ६ सत्रे | – ६ सत्रे |
| **५. पथकप्रमुख बैठक** | – आठवड्यातून एकदा मार्गदर्शनपर बैठक (वर्षभरात ५०% विद्यार्थ्यांना पथकप्रमुख होण्याची संधी!) | |
| **६. ऐच्छिक उपक्रम** | नेतृत्व अनुभवण्याच्या, समृद्ध करण्याच्या, अभिव्यक्त करण्याच्या अनेक संधी!<br>– ग्रेट भेट मुलाखत स्पर्धा, मेळावे, कार्यशाळा यांचे आयोजन.<br>– युवोन्मेष या नियतकालिकात लेखन, संपादन, वितरण, अर्थ उभारणी इ. मध्ये सहभाग.<br>– सुट्ट्यांमध्ये महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर अन्य राज्यांमध्ये ४ ते ८ दिवसांच्या अनुभवसमृद्ध करणाऱ्या अभ्यास सहली.<br>– ज्ञान प्रबोधिनीतील ज्ञानसेतू, युवोन्मेष, नागरवस्ती प्रकल्प, दुष्काळ निवारण कार्य, ग्रामविकसन, छात्र प्रबोधन, युवक-युवती कार्य इ. विभागांच्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची, जबाबदारी घेण्याची संधी.<br>– २ ते ३ महिने मिळून १०० तास 'कमवा व शिका' योजनेतून कार्यानुभव व अर्थार्जनाची संधी! | |



## २) प्रिपरेटरी - UPSC परीक्षा तयारी

प्रशासकीय सेवेसाठीच्या स्पर्धा परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी हा अभ्यासक्रम तयार करण्यात आलेला आहे. GS व CSAT सत्रे दोन तासांची व अन्य सत्रे एक तासांची असतील.

| तपशील | Basic (जिज्ञासा) | Advance (आकांक्षा) |
|---|---|---|
| **१. GS व CSAT** | सर्व विषयांचा मिळून ८० सत्रे | बेसिक मधील विषयांचा सखोल अभ्यास करण्यासाठी सर्व विषयांची मिळून एकूण १२० सत्रे |
| **२. सद्य घडामोर्डीचा अभ्यास** | साप्ताहिक एक तास | साप्ताहिक दोन तास |
| **३. UPSC Orientation** | १० सत्रे | ८ सत्रे |
| **४. अभ्यास कौशल्ये, सवयी, तंत्रे** | २० सत्रे | १० सत्रे |
| **५. प्रशासकीय अधिकारी अनुभवकथने** | प्रत्येक वर्षी ३ प्रशासकीय अधिकाऱ्यांची अनुभवकथने | |
| **६. मूल्यमापन** | - प्रत्येक विषयाची लेखी परीक्षा, उत्तरपत्रिकांचे विश्लेषण व चर्चा<br>- प्रत्येकाने वर्षातून २ वेळा विषयातील छोटे प्रकरण १० मिनिटांच्या Presentations द्वारा वर्गातील सर्वांना समजावून सांगणे<br>- आकांक्षा वर्गासाठी प्रत्येक विषयाच्या अभ्यासाला पुढावा देणाऱ्या Assignments<br>- कोर्सच्या शेवटी UPSC Prelim प्रमाणे GS व CSAT या विषयांची परीक्षा<br>- सद्य घडामोडीसंदर्भात प्रकल्प, सादरीकरण | |







# प्रवेश प्रक्रिया

* वर्गाला प्रवेश घेण्यासाठी शेजारील QR Code स्कॅन करून अर्ज भरावा, त्यानंतर आपण व्हॉट्सअप गटात सामील व्हाल.
* व्हॉट्सअप गटावर प्रवेश परीक्षा फॉर्म पाठवला जाईल. प्रवेश परीक्षेचे परीक्षा शुल्क रू. १००/- भरावे. आपण निवडलेल्या प्रवेश परीक्षेच्या तारखेला प्रत्यक्ष ज्ञान प्रबोधिनी नेतृत्व संवर्धन केंद्र, पुणे येथे उपस्थित राहून प्रवेश परीक्षा द्यावी.

**प्रवेश परीक्षा स्वरूप:** – **एकूण गुण – ७५**
– वैयक्तिक माहिती – २० गुण
– सद्य घडामोडींवर आधरित निबंध लेखन – २५ गुण
– मुलाखत – ३० गुण

**वेळ :** – **२ तास**

* प्रवेश परीक्षेच्या आधारावर निवडक विद्यार्थ्यांची निवड यादी व प्रतिक्षा यादी WhatsApp गटावरच प्रसिद्ध केली जाईल.
* निवड यादीतील विद्यार्थ्यांनी ८ दिवसांच्या आत शुल्क भरून आपला प्रवेश निश्चित करावा. प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना ३१ मे नंतर उपलब्धतेनुसार गुणानुक्रमे प्रवेश दिला जाईल.
* शुल्क भरल्यानंतर आपणास वर्गाच्या Whatsapp गटात सामील होण्यासाठी लिंक मिळेल. त्यात तुम्ही सहभागी व्हावे. तेथे तुम्हाला पुढील तपशील मिळतील.

वरील प्रक्रियेत कुठल्याही स्वरूपाची अडचण आल्यास केंद्राच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष येऊन अथवा ०२० – २४२०७१७९ / ८८३०६२५५१४ या क्रमांकावर संपर्क करावा.

**दोन्ही वर्षांचे एकूण शुल्क - रु. १,५०,०००/- (GST सह)**
**पहिल्या वर्षाचे एकूण शुल्क - रु. ७५,०००/- (GST सह)**

| शुल्क भरण्याच्या दिनांकानुसार सवलतींचे तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| **शुल्क भरण्याचे तपशील** | **पर्याय १** (दोन्ही वर्षांचे एकत्रित शुल्क भरल्यास) | **पर्याय २** (एका वर्षाचे शुल्क भरल्यास) | **पर्याय ३** (वर्ग सुरू हेण्यापूर्वी एका वर्षाचे शुल्क भरल्यास) | **पर्याय ४** (टप्प्याटप्प्याने एका वर्षाचे शुल्क भरल्यास) |
| **प्रवेश प्रक्रियेमध्ये निवड झाल्यानंतर १० दिवसात शुल्क भरल्यास** | १,२०,०००/- | ६५,०००/- | ३५,०००/- | - |
| **१) २५ जून २०२६ पर्यंत** | - | - | ३५,०००/- | ३५,०००/- |
| **२) ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत** | - | - | - | ४०,०००/- |
| **एकूण शुल्क** | **१,२०,०००/-** | **६५,०००/-** | **७०,०००/-** | **७५,०००/-** |
| **एकूण शुल्कातील सवलत** | **३०,०००/-** | **१०,०००/-** | **५०००/-** | **-** |

• **शुल्कात सवलत** – आर्थिकदृष्ट्या वंचित गटातल्या ३ ते ५ विद्यार्थ्यांना शुल्कामध्ये १०% ते ४०% सवलत दिली जाईल. गरजू विद्यार्थ्यांनी सवलत मिळवण्यासाठी प्रवेश निश्चितीच्या वेळी तसा अर्ज करावा. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, मुलाखत व वर्गातील सहभाग यांच्या आधारे १ ऑगस्ट २०२६ पूर्वी शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांची यादी जाहीर केली जाईल. या विद्यार्थ्यांनी वर्ग सुरू होण्यापूर्वी रु. ३५,०००/- भरून नाव निश्चिती करणे आवश्यक आहे. ज्यांचे शिष्यवृत्ती अर्ज मान्य होणार नाहीत त्यांना एकूण शुल्क रु. ७५,०००/- एवढे भरावे लागेल.

• **प्रवेश रद्द केल्यास शुल्क परतावा मिळणेबाबत**

१. **वर्ग सुरू होण्यापूर्वी प्रवेश रद्द केल्यास** – जमा शुल्काच्या २०% किंवा रु. १०,०००/- (यांपैकी जी रक्कम कमी असेल) वजा करून भरलेल्या शुल्कातील उर्वरित रक्कम परत केली जाईल.
२. **वर्ग सुरू झाल्यावर एक महिन्याच्या आत प्रवेश रद्द केल्यास** – जमा शुल्काच्या ४०% किंवा रु. १०,०००/- (यांपैकी जी रक्कम कमी असेल) + भरलेल्या शुल्कावरील GST ची रक्कम वजा करून उर्वरित रक्कम परत केली जाईल.
३. **वर्ग सुरू झाल्यावर एक महिन्यानंतर प्रवेश रद्द केल्यास शुल्क परत केले जाणार नाही.**

# सामाजिक नेतृत्व विकसनाचा ''अग्रदूत प्रकल्प''

समाजाचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी संघटित प्रयत्नांची आवश्यकता असते. त्यासाठी विविध क्षेत्रात पुढाकार घेऊन नेतृत्वाची धुरा सांभाळणारे युवक, युवती तयार करणे विशेष गरजेचे आहे. नेतृत्व हे जन्मजातच असते असे नाही, तर अनेकांमध्ये असलेल्या सुप्त नेतृत्वगुणांचा विकास प्रशिक्षण, अनुभव, आव्हाने व सहवास यांच्या आधारे करता येतो, असा ज्ञान प्रबोधिनीचा अनुभव आहे.

याच हेतूने ज्ञान प्रबोधिनी नेतृत्व संवर्धन केंद्राच्या वतीने नेतृत्वाची क्षमता, प्रेरणा असणाऱ्या युवक - युवतींसाठी **''अग्रदूत प्रकल्प''** राबविण्यात येत आहे. हा **प्रकल्प १७ ते २२ (महाविद्यालयीन गट) आणि २३ ते ३५ (सामाजिक कार्यकर्ते गट)** या दोन गटांमध्ये स्वतंत्रपणे राबावला जातो.

**अग्रदूत प्रकल्प स्वरूप:**

| प्रकल्पाचे स्वरूप | विद्यार्थी गट | सामाजिक संस्था गट |
|---|---|---|
| **टप्पा-१ - निवड प्रक्रिया** | व्यक्तीकार्य व गटकार्य यांमधून निवड | नावनोंदणी फॉर्म, संस्थांचालकांच्या शिफारसी, प्रत्यक्ष मुलाखती यांमधून निवड |
| **टप्पा-२ - प्रशिक्षण** | नेतृत्व कौशल्य प्रशिक्षण व सामाजिक प्रश्नांची जाणीव | निवड शिबिर |
| **टप्पा-३ - सामाजिक प्रकल्प** | आपापल्या गावात / शहरात २ महिने कालावधीचा प्रकल्प | ज्या संस्थेत काम चालू आहे तिथेच ६ महिने कालावधीचा प्रकल्प |
| **शिष्यवृत्ती** | रु. ५०००/- | रु. २५,०००/- |
| **प्रकल्पासाठी आर्थिक सहाय्य** | रु. ५०००/- | रु. २५,०००/- |
| **अन्य बक्षीसे** | • १ महिन्याची सामाजिक प्रकल्प भेट सहल<br>• आंतरवासिता (Intership) | १ वर्षाची फेलोशिप (Fellowship) |
| **कालावधी** | जून २०२६ ते मार्च २०२७ (८ महिने) | ऑगस्ट २०२६ ते जुलै २०२७ (१ वर्ष) |
| **व्याप्ती** | पुणे जिल्हा - पुणे शहर, बारामती, राजगुरूनगर, पुरंदर इ. तालुके | संपूर्ण महाराष्ट्र |

**आपल्या संपर्कतील इच्छुक युवक-युवतीं अवश्य सहभागी व्हायला सांगावे!**

*** दोन्ही गटांसाठी जून २०२६ पासून नाव नोंदणी प्रक्रिया सुरु होईल.**

वरील प्रकल्पाचा भाग होण्यासाठी खाली दिलेल्या संपर्क क्रमांकावर संपर्क करावा

**संकेत दादा: ८९९९८९१४७२, राजेश्वरी ताई: ९०२१०६६८६२ Email: agradoot@jnanaprabodhini.org**

## ❊ नेतृत्व विषयक अन्य उपक्रम ❊

**'युवोन्मेष' नियतकालिक:** नेतृत्वगुण विकसन या विषयावरील संकल्पनात्मक साहित्य निर्मिती, विविध नेत्यांच्या अनुभवांचे संकलन, विद्यार्थ्यांच्या अनुभवांचे संकलन इ. साठी युवोन्मेष हे नियतकालिक प्रकाशित केले जाते. नेतृत्व संवर्धन केंद्राच्या उपक्रमांमध्ये या वर्षी सहभागी विद्यार्थ्यांसाठी मोफत छापील अंक, तर मागणीनुसार संपर्कातील सर्व युवक, युवती, माजी विद्यार्थी यांच्यासाठी मोफत इ-अंक वितरित केला जातो. या अंकाच्या मोफत इ प्रती हव्या असल्यास **yuvonmesh@jnanaprabodhini.org** यावर संपर्क करावा.

**'ग्रेट-भेट' मुलाखत स्पर्धा:** कला, विज्ञान, सामाजिक कार्य अशा वेगवेगळ्या क्षेत्रात विशेष कामगिरी व नेतृत्व केलेल्या व्यक्तींची ३ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या गटाने मुलाखत घेणे, त्या व्यक्तींचे गुण आणि धडपड समजून घेणे अशा संधी या स्पर्धेच्या निमित्ताने दिली जाते. यासाठी आवश्यक मुलाखत कौशल्यांचे प्रशिक्षण आधी देण्यात येते. मुलाखत घेऊन दिलेल्या गोष्टी जमा केल्यावर मूल्यमापन केले जाते व विशेष गुणवत्ता गाठलेल्या गटांना पारितोषिकेही दिली जातात.

**या स्पर्धेची नोंदणी प्रक्रिया नोव्हेंबर २०२६ मध्ये सुरु होईल.**

संपर्क - ज्ञान प्रबोधिनी, नेतृत्व संवर्धन केंद्र, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411 030, website: https://netrutwavikas.jnanaprabodhini.org/

फोन - ०२०-२४२०७१७९/८८३०६२५५१४/९३०७९१६६८७ E-mail - leadershipfc@jnanaprabodhini.org